




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

रविवार, दि. २६ मे २०२४








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : २ रे | अंक : २६८ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com

Editor : Dr. Vishwasrao Anandrao Arote | Registration no. MAHMAR/2021/82132 | Pages : 4 | Year : 2nd | Issue : 268 | Amount : 4 Rs/- | Gmail : punegavkari@gmail.com




## गुजरातमध्ये अग्नितांडव!

### गेमिंग झोनमध्ये लागलेल्या आगीत २० जणांचा मृत्यू; आकडा वाढण्याची शक्यता

**गुजरात : (समर्थ गांवकरी)**

गुजरातमधून अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. गुजरातच्या राजकोटमध्ये लागलेल्या आगीत नऊ जणांचा होरपळून मृत्यू झालाय. गुजरातच्या राजकोटमधील टीआरपी गेम झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीत २० जणांचा मृत्यू झाला आहे. आगीच्या घटनेमुळे संपूर्ण गेम झोन खाक झाला आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ८ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. बचावकार्यासह आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. आग विझल्यानंतरच परिस्थिती स्पष्ट होईल, असे पोलिसांनी म्हटलंय. या घटनेनंतर मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनीही प्रशासनाला बचाव आणि मदतकार्य हाती घेऊन जखमींवर उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राजकोटमधील टीआरपी गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीत मृतांची संख्या २० वर पोहोचली आहे. दुपारच्या सुमारास लागलेल्या या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरु आहे. आगीचे कारण काय आहे याचा आम्ही तपास करत आहोत. यासोबतच शहरातील सर्व गेमिंग झोन बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे राजकोट पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. या आगीच्या घटनेतून १० हून अधिक जणांना वाचवण्यात यश आले आहे. गेम झोनमध्ये अजूनही लोक अडकले असण्याची शक्यता आहे. या आगीत संपूर्ण गेम झोन जळून खाक झालाय. त्यामुळे मृतदेहांपर्यंत पोहोचणे देखील अवघड झालं आहे. "टीआरपी गेमिंग झोनमध्ये दुपारी आग लागली होती. बचावकार्य अद्याप सुरू आहे मात्र आग आटोक्यात आली आहे. आम्ही शक्य तितके मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहोत. आतापर्यंत सुमारे २० मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत आणि पुढील तपासासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. हा गेमिंग झोन युवराज सिंग सोलंकी नावाच्या व्यक्तीच्या मालकीचा आहे. निष्काळजीपणा आणि मृत्यू झाल्याबद्दल आम्ही गुन्हा नोंदवणार आहोत. आम्ही येथे बचाव कार्य पूर्ण केल्यानंतर पुढील तपास केला जाईल," अशी माहिती राजकोटचे पोलिस आयुक्त राजू भार्गव यांनी दिली.



## डोंबिवलीच्या अमूदान कंपनीत स्फोट कसा झाला?

### आरोपीच्या वकिलांनी दिली धक्कादायक माहिती

**डोंबिवली: (समर्थ गांवकरी)**

डोंबिवली एमआयडीसीतील अंबर (अमूदान) केमिकल कंपनीत गुरुवारी झालेल्या स्फोटानं नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालंय. या घटनेत आत्तापर्यंत ११ निरपराधांचे बळी गेले असून अद्यापही घटनास्थळी मानवी अवशेष सापडत आहेत. या भीषण स्फोटामुळे आजूबाजूला रासायनिक कारखान्याला चिकटून राहणाऱ्या हजारो कुटुंबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. या स्फोटानंतर कंपनीच्या मालकाला अटक करण्यात आली असून कोर्टाने मलय मेहताला २९ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. मात्र आता कोर्टात आरोपीच्या वकिलाने स्फोट नेमका कशामुळे झाला याबाबत धक्कादायक माहिती दिली.



डोंबिवलीतल्या अमुदान कंपनीत स्फोट झाल्यानंतर ११ जणांचे मृत्यू झाले होते. गुरुवारी दुपारच्या सुमारास स्फोट झाल्यानंतर दिवसभर शोधकार्य करण्यात येत होतं. मात्र रात्री अचानक पुन्हा कंपनीमध्ये आग लागली. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला. अमुदान कंपनी स्फोट प्रकरणात कंपनीच्या दोन्ही मालकांना अटक करण्यात आली होती. अमुदान कंपनीचे मालक मालती मेहता यांना नाशिक पोलिसांनी आणि मलय मेहता यांना ठाण्याच्या गुन्हे शाखेने अटक केली. त्यानंतर कोर्टाने मलय मेहता यांना २९ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तर मालती मेहता यांची चौकशी करुन सोडून देण्यात आलं आहे.

मालती मेहता यांच्या पतीच्या निधनानंतर कंपनी मुलाच्या नावावर करण्यात आली होती, अशी माहिती पोलीस तपासात पुढे आली. मात्र सुनावणीदरम्यान,मेहतांच्या वकिलांनी कोर्टात महत्त्वाची माहिती दिली.

स्फोट झाल्यानंतर सुरुवातीला कंपनीमध्ये बॉयलर फुटल्याची माहिती देण्यात येत होती. मात्र नंतर स्फोट झालेल्या कंपनीमध्ये कोणताच बॉयलर नसल्याची माहिती पुढे आली. हा बॉयलरचा स्फोट नसून हा रिएक्टरचा स्फोट असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं होतं. शनिवारी कोर्टात मेहतांच्या वकिलांनी, स्फोटाआधी कंपनीचे मालक देखील तिथे जाणार होते. मात्र त्यांना उशीर झाल्याने ते तिथे पोहचू शकले नाहीत. नाहीतर त्यांच्यासोबतही काहीतरी घडले असते असे सांगितले. हा स्फोट हा वाढत्या उष्णतेमुळे झाल्याचे वकिलाने सांगितले. तसेच मेहता यांच्या वकिलाने युक्तिवाद केला की कंपनीकडे सर्व आवश्यक परवानग्या होत्या आणि सर्व नियमांचे पालन केले होते.

या प्रकरणात मध्यस्थी याचिका करणाऱ्या प्रियेश सिंग यांनी ही माहिती दिली. आरोपीच्या वकिलाने सांगितले की तापमान वाढल्यामुळे हा स्फोट झाला. पण तिथले तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी कंपनीने काय केल? तुम्ही निष्काळजीपणा केल्यामुळे हे झालं असा आरोप प्रियेश सिंग यांनी केला आहे.

## शरद पवार गटाचे सर्व आक्षेप निवडणूक आयोगाने फेटाळले

### आक्षेपार्ह व्हायरल व्हिडिओ महाराष्ट्राचे नसल्याचा दावा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

लोकसभा निवडणुकीत मतदान प्रक्रिये दरम्यान बारामती, अहमदनगर आणि बीड लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला असल्याचा आरोप शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आला आहे. या मतदारसंघांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या वतीने बुथ हायजॅक करण्यात आल्याचा आरोप देखील शरद पवार गटातील नेत्यांनी केला होता. या संदर्भातले काही व्हिडिओ देखील समाज माध्यमांवर व्हायरल होत होते. मात्र हे व्हायरल व्हिडिओ महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूक 2024 चे नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया ही सुरळीत आणि शांततेत पार पडली आहे, असा दावा देखील निवडणूक आयोगाने केला आहे.



या संदर्भात निवडणूक आयोगाने एका पोस्टच्या माध्यमातून माहिती दिली आहे. निवडणूक आयोग म्हणाला की, 'काही व्यक्ती निवडणूक प्रक्रियेला बाधा पोहचवणारी कृती करतानाचे, आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत छेडछाड करत असल्याच्या इतर राज्यांमधील जुन्या चित्रफिती समाज माध्यमांवर फिरत असल्याचे निदर्शनास आले आहे. या चित्रफिती लोकसभा निवडणूक २०२४ अंतर्गत महाराष्ट्रातील मतदान प्रक्रियेशी संबंधित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडली आहे.'

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने निवडणूक प्रक्रिये दरम्यान मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप निवडणूक आयोगावर केला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार नीलेश लंके, आमदार रोहित पवार यांच्यासह काही प्रमुख पदाधिकाऱ्यांनी काही व्हिडिओ देखील समाज माध्यमांवर पोस्ट केले होते. तसेच काही व्हिडिओ हे सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या आक्षेपार्ह व्हायरल व्हिडिओची तपासणी निवडणूक आयोगाच्या वतीने करण्यात आली आहे. या तपासणीमध्ये हे व्हिडिओ इतर राज्यातील जुने असल्याचे निदर्शनास आले असल्याचेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

## उन्हाचा कहर : अकोल्यातही जमावबंदी घोषित करण्याची वेळ

- पारा 45 डिग्रीवर पोहोचल्याने जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश
- अकोला जिल्ह्यातही जमाबबंदीचे आदेश लागू

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

जळगाव जिल्ह्यात उष्णतेची लाट सुरु आहे. जळगाव जिल्ह्यात तापमानाचा पारा 45 अंश सेल्सिअसवर गेले आहे. यामुळे जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. उष्णतेचा धोका लक्षात घेता जिल्ह्यात 25 मेपासून 3 जूनपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जमाबंदीचे आदेश काढले आहेत. उष्णतेच्या लाट्याच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा आरोग्य विभागाने परिपत्रक जारी केले आहे.



महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमधील वाढत्या उन्हाने कहर केलेला आहे. 40 अंश सेल्सियसच्या वर गेलेल्या तापमानात अंगाची लाहीलाही होत आहे.

परंतु राज्यातील उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील काही शहरांमधील तापमान 45 अंश सेल्सिअसवर गेले आहे. यामुळे उष्मघाताचा धोका निर्माण झाला आहे.

उष्णतेचा धोका लक्षात घेता अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी अकोला जिल्ह्यात 31 मे' पर्यंत कलम 144 अन्वये जमावबंदी लागू केली आहे.

हा आदेश त्यांनी शनिवार 25 मे रोजी निर्गमित केला आहे. दरम्यान आज अकोल्यात 45.06 अंश एवढं तापमान नोंदवण्यात आलंय.

तत्पूर्वी जळगाव जिल्ह्यातही तापमानाचा कहर पाहायला मिळत असून तेथील जिल्हाधिकाऱ्यांनीही जिल्ह्यात 144 कलम लागू केले आहे. मात्र, हे कलम लागू करण्यामागचं उद्देशही त्यांनी स्पष्ट केला आहे. तसेच, 144 लागू करणे म्हणजे संचारबंदी किंवा लॉकडाऊन नाही, असेही ते म्हणाले.

धुळे शहराचा तापमानाचा पारा तब्बल 44 अंशाच्या पुढे गेला आहे. धुळ्यात 44.5° अंश सेल्सिअसवर गेले आहे. गेल्या महिन्याभरापासून धुळे शहरात 40 अशांच्या पुढे तापमान आहे. वाढलेल्या तापमान मुळे शहरातील रस्ते निर्मनुष्य झाले आहेत. हवामान विभागाने येत्या काळात अजून तापमान वाढणार असल्याचे म्हटले आहे. यामुळे नागरिकांनी दुपारी बाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### या गोष्टींवर लावण्यात आले निर्बंध..!

- रोजगार हमीसह वेगवेगळ्या प्रकल्पाची कामे असल्यास मजुरांना सोबत घेऊन कडक उन्हात काम न करण्याच्या वेगवेगळ्या शासकीय विभागांना सूचना दिल्या आहेत.
- खासगी कोचिंग क्लासेसच्या संचालकांनी सकाळी १० वाजेपर्यंत कोचिंग सेंटर चालवावे. पर्यायी व्यवस्था करावी, असे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले आहेत.
- कामाच्या ठिकाणी कामगारांना पुरेशे शेड तयार करणे, कुलर किंवा इतर साधने पुरवण्याची जबाबदारी संबंधित प्रतिष्ठान, कंपनी मालकांची राहणार आहे.
- दहा वर्षाखालील बालकांनी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत बाहेर खेळू नये पालकांनी काळजी घ्यावी.
- दैनंदिन काम असल्यास रुमाल टोपी अशी आवश्यक खबरदारी घेऊन बाहेर पडावे. मुबलक पाणी प्यावे.
- उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास तातडीने शासनाच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून उपचार करून घ्यावे.



# 50 लिटर दूध देणाऱ्या गायी निर्मितीचे उद्दिष्टे : रणजितसिंह देशमुख

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

माजी कृषी मंत्री तथा विधिमंडळ पक्षनेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात दुधाळ गायींची निर्मिती करून अधिकाधिक दूध देणाऱ्या गाईंची संख्या वाढविणे व त्यातून आर्थिक समृध्दी करणे गरजेचे आहे, असे विचार संगमनेर दूध संघाचे चेअरमन मा. रणजितसिंह देशमुख यांनी व्यक्त केले.

राजहसं मिशन 50-L अंतर्गत रायतेवाडी, ता. संगमनेर येथील शरद दत्तात्रय मंडलिक यांचे मुक्त संचार गोठाचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर दूध संघाचे व्हा. चेअरमन राजेंद्र पा. चकोर,संचालक विलासराव कवडे,प्रमोद पावसे, शॅम्प्रोचे संचालक तान्हाजीराव आहेर, गरूड कुक्कुपालन संस्थेचे संचालक गणपतराव बांगर, सुभाष पाटील गुंजाळ, दूध संघाचे कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी, पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. विजय कवडे, दूध संकलन अधिकारी भाऊसाहेब आहेर,केंद्राधिकारी विजय पावसे आदी उपस्थित होते.

यावेळी देशमुख पुढे म्हणाले की, दूध संघाने 'राजहंस मिशन 50-L' अंतर्गत 50 लिटर दूध देणाऱ्या गायी निर्मितीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. यासाठी गोठा , आहार, आरोग्य व प्रजनन व्यवस्थापन या बाबीवर शास्त्रीय पध्दतीने काम केले जात आहे. त्यातुनच अधिक दूध देणाऱ्या गायींची निर्मिती केली जाणार आहे. दुग्धव्यवसायामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मजबुत झाली आहे. दुग्धव्यवसाय अधिक किफायतशीर करावयाचा असेल तर दुग्धव्यवसायात अत्याधुनिकता आणली पाहिजे.

नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. मुक्त संचार गोठा ही अत्याधुनिक संकल्पना आहे, मुरघास, सेक्स सॉर्टेड सिमेन इत्यादींचा अवलंब दूध उत्पादकांनी केला पाहिजे. थोर स्वातंत्र्य सेनानी सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांनी सन 1977 साली दूध संघाची स्थापना केली. त्यांच्या आदर्श विचारावर या संघाची वाटचाल चालू आहे. पारदर्शक व चांगल्या कामातून राज्यात हा दूध संघ आदर्श ठरला आहे.

# संपादकीय



## लिहित्या हातांसाठी उमेद

ग्रंथकारांची मातृसंस्था म्हणून ज्या संस्थेचा उल्लेख केला जातो त्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची (मसाप) मुहूर्तमेढ १९०६ मध्ये पुण्यात भरलेल्या चौथ्या ग्रंथकार संमेलनात रोवली गेली. संस्था कितीही दिग्गज लोकांनी स्थापन केली, तरी तिचे भवितव्य ती चालवणाऱ्या पुढच्या पिढ्यांवरच अवलंबून असते. काही अपवाद वगळता 'मसाप' ला सक्षम वैचारिक नेतृत्व लाभले. लिहित्या-वाचत्या लोकांसाठी वर्तमानकाळ किती कसोटीचा आहे, याची नेमकी जाणीव असलेले 'मसाप'चे वर्तमान कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली विद्यमान कार्यकारी मंडळ काम करीत आहे.

पुण्यातील या संस्थेमध्ये प्रवेश करताना पूर्वी लोकांच्या मनावर अकारण ताण यायचा. कारण तिथला अतिशय चाकोरीबद्ध, इतरांना शिरकाव करू न देणारा साहित्य व्यवहार. लिहिणाऱ्या-वाचणाऱ्यांचा वर्ग प्रामुख्याने मुंबई-पुण्यातलाच असतानाच्या काळातले ते चित्र आज बदलले आहे. कसदार साहित्यनिर्मिती करून उर्वरित महाराष्ट्रातील लेखक मंडळींनी आपले स्थान साहित्य व्यवहारात निर्माण केले. या बदलाची नोंद न घेणाऱ्या शहरी साहित्य संस्था कालबाह्य ठरत गेल्या. या नेमक्या वळणावर 'मसाप'ने मात्र ग्रामीण भागात आपल्या शाखांचा विस्तार केला आणि साहित्य चळवळ ग्रामीण भागात अधिक कशी फोफावेल, याद्दष्टीने प्रयत्न केले. आज साहित्य परिषदेच्या ग्रामीण भागातील शाखा तेथील साहित्यिकांना उत्तेजन मिळावे यासाठी उत्तम कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत. कुटिल राजकारण, हेवेदावे यांनी ग्रासलेल्या साहित्य संस्थांच्या राजकारणाला फाटा देऊन मूळ कामाकडे लक्ष केंद्रित करण्याचे जे प्रयत्न विद्यमान पदाधिकाऱ्यांनी केले, त्यामुळे 'मसाप' मधले वातावरण बहरलेले दिसते. पुण्यासह महाराष्ट्रभरातल्या साहित्य संस्थांना जोडून घेण्यात्तून मसाप अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचली. त्यामुळे तिथला राबता वाढला.

परिषदेच्या ऐतिहासिक वास्तूला धक्का न लावता ती अत्याधुनिक व्हावी असे साहित्यप्रेमींना वाटत होते. विश्वस्त डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. पी. डी. पाटील, यशवंतराव गडाख, डॉ. तानाजीराव चोरगे, राजीव बर्वे यांनी या साठी पदरमोड केली, ही सांस्कृतिक विश्वातील लक्षणीय घटना होय! आज परिषदेचे सभागृह, कार्यालय, ग्रंथालय यात झालेला बदल सर्वांना सुखावणारा आहे. ते श्रेय पदाधिकाऱ्यांच्या कौशल्याचे, तत्परतेचेही! समाजजीवनात भाषा आणि साहित्य व्यवहारासमोर आव्हाने उभी राहतात तेव्हा साहित्य संस्थांनी भूमिका घ्यावी, अशी समाजाची किमान अपेक्षा असते. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून पंतप्रधानांना लाखभर पत्रे पाठवण्यापासून दिल्लीत जाऊन आंदोलन करण्यापर्यंत साहित्य परिषदेने आपले काम चोख केले. भाषा शिक्षणाच्या कायद्यासाठी कृतिशील पुढाकार घेतला. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सन्मानाने देण्यासाठी साहित्य महामंडळाने केलेल्या घटनाबदलात महत्त्वाची भूमिका बजावली. दुर्मीळ ग्रंथांचे डिजिटलायजेशन आणि नुकताच प्रकाशित केलेला 'अक्षरधन' हा संशोधन ग्रंथ यामुळे जुन्या ग्रंथांचे जतन आणि संशोधन यांनाही परिषद प्राधान्य देते, ही महत्त्वाची गोष्ट आहे. साहित्य परिषदेच्या पुरस्कार निवडीतील पारदर्शकता टिकविण्याचे आव्हान या संस्थेने यशस्वीपणे पेलले आहे. कवी बा. सी. मर्ढेकर यांच्या मर्ढे (जि. सातारा) येथील घराची दुरवस्था झाली होती. परिषदेच्या सातारा जिल्ह्यातील शाहूपुरी शाखेने मर्ढेकरांच्या घराचे स्वखर्चाने पुनरुज्जीवन केले. अशी कामे मार्गी लावण्यासाठी साहित्य संस्थांनी पुढाकार घेणे अपेक्षित असते, परिषदेने तो घेतला.

घटनेवर बोट ठेवून संस्थेला वेठीस धरणारे लोक सर्वत्र असतात, पण घटनेमध्ये कालोचित बदल अत्यावश्यक असतात. येत्या पन्नास-शंभर वर्षांचा काळ नजरेसमोर ठेवून 'मसाप'ने हे आव्हान पेलण्याची वेळ आलेली आहे.

यापूर्वीच्या पदाधिकाऱ्यांनीही स्थापन केलेल्या समित्यांचे मसुदे बासनातच राहिले, विद्यमान पदाधिकाऱ्यांना हे लक्षात ठेवून तत्परता दाखवावी लागेल.येणारा गुंतागुंतीचा काळ नवनवीन आव्हाने घेऊन येईल. त्या वाटांवरून चालू पाहणाऱ्या नव्या लेखकांना 'मसाप'च्या वटवृक्षाचा आधार वाटत राहावा, हीच वर्धापन दिनाच्या निमित्ताने अपेक्षा...

# सुरेश म्हात्रे यांची नुकसानग्रस्त बांधवांशी भेट

**खर्डी : (समर्थ गांवकरी)**

अवकाळी पावसाने व वादळ वाऱ्याने प्रचंड नुकसान झालेल्या चिल्लारवाडी व परिसर या आदिवासी दुर्गम भागामध्ये आज सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांनी भेट घेऊन मदतीचा हात दिला. चिल्लरवाडी व परिसरातील ज्या गावांमध्ये घरांचे नुकसान झाले आहे. त्या सर्वांना तातडीने मदत केली जाईल. तसेच अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येईल असे त्यांनी सांगीतले.



लोकसभेचे उमेदवार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांनी आपली तब्येत बरी नसतानाही आज शहापूर तालुक्यातील साकडबाव पठारावर नुकसान ग्रस्त भागाची पाहाणी करून मदतीचा हात दिला.

गेल्या काही दिवसांपासून शहापूर तालुक्यात वादळी पावसाने हाहाकार उडविला असून आज साकडबाव पठारावरील आदिवासी वाड्यांमध्ये अवकाळी पाऊस व वादळाने धुमशान माजविल्याने आदिवासी बांधवांचे संसार उघड्यावर पडले आहेत. या घटनेची माहिती मिळताच आपली प्रकृती ठीक नसतानाही लोकसभेचे उमेदवार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे साहेब यांनी तात्काल घटनास्थळी भेट देऊन येथील आदिवासींच्या घरांची पाहणी करून नुकसानग्रस्त आदिवासी बांधवांना भरघोस मदत केली.

कोणीही मदतीपासून वंचीत राहणार नाही याची काळजी घेण्याचं सांगितलं ज्यांचे पत्रे उडाले त्यांना पत्रे ज्यांची कैले घोणे इडले त्यांना घोणे व ज्यांना जी गरज आहे ती उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशी भरीव मदत करून मदतीचा हात दिला आहे. त्याचबरोबर आदिवासी बांधवांना आधार देण्याचे काम केले आहे. यावेळी माजी आमदार पांडुरंग बरोरा, मा.जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे, महिला जिल्हा अध्यक्षा विद्या वेखंडे, भास्कर भोईर, राजेंद्र डोंगरे, अरुण अधिकारी, दिनेश कांबळे, रविंद्र खाडे, निलेश विशे विभाग प्रमुख बारकू वाघ, सरपंच जना भगत, नामदेव गिरा आदी उपस्थित होते.

शहापूर तालुक्यातील साकडबाव पठारावरील जळक्याचीवाडी, पोकळ्याचीवाडी चिल्लरवाडी , रुमालगाव तसेच इतर गाव - पाडायांनमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने थैमान घातले असून अनेक घरांचे पत्रे, कौले उडाल्याने त्यांचे संसार उघड्यावर पडले आहेत.वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने परिसरातील विजेचे खांब,वीज वाहिन्या व सर्वात महत्वाचे वीज रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) कोसळून खाली पडले आहे. त्यामुळे विजेअभावी पंचवीस गाव व पाडे अंधारात सापडले होते. वीज वितरण कंपनीला फोन करून फास्ट ट्रॅक वर येथील कामं करून त्वरित वीज पूर्ववत करून देण्याच्या सूचना बाळ्या मामा यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# गॅस सिलेंडर धारकांनी केवायसी करणे आवश्यक

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

उज्वला गॅस कनेक्शनधारकांना केवायसी करण्यासाठी वितरकांकडून आवाहन केले जात आहे. मात्र, केवायसीकडे अनेकांनी पाठ फिरविल्याचे दिसून येते. अनेकांची केवायसी रखडल्याने वितरकांना डाटा अपडेट करताना चांगल्याच अडचणी येत असून, केवायसी न केल्यास गॅस कनेक्शन बंद होणार असल्याची शक्यता गॅस एजन्सी चालकांनी वर्तविली आहे. त्यामुळे लवकर गॅस सिलिंडरधारकांनी ई-केवायसी करणेआवश्यक आहे असे साईनाथ गॅस एजन्सी चालक श्रीकांत जावक यांनी सांगितले. श्रीगोंदे शहर आणि तालुक्यांतील वितरकांकडे ३१ मे ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. सर्वच गॅसधारकांना केवायसी करणे अनिवार्य आहे. केवायसी न करणाऱ्या नियमित ग्राहकांना तसेच उज्वला योजनेच्या गॅस कार्डधारकांना ३०० रुपये दिली जाणारी सबसिडी कायमची बंद केली जाणार आहे. ग्राहकांचे गॅस कनेक्शनही बंद केले जाणार आहे. त्यामुळे गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरू ठेवण्यासाठी सर्व ग्राहकांनी केवायसी करून घ्यावी, असे आवाहन श्रीकांत जवक यांनी केले आहे.


केवायसी झालेल्या ग्राहकांची माहिती कंपन्यांकडे उपलब्ध असून, अनेक कार्डधारकांची केवायसी अजून बाकी असल्याचे साई गॅस एजन्सी चे अधिकृत विक्रेते श्रीकांत जवक यांनी सांगितले आहे

उज्वला गॅस सिलिंडरधारकांनी साई गॅस एजन्सीमध्ये जाऊन केवायसी करून घ्यावी, त्यासाठी आधार कार्ड, मोबाइल क्रमांक, गॅस जोडणी ग्राहकांचे पुस्तक, ग्राहकांचे फेस रीडिंग किंवा थम्ब, हे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# दरवर्षी प्रमाणे बारावी बोर्ड परीक्षेत श्रीगोंद्यातील पारे सरांच्या 'सायन्स फोरम कोचिंग अकॅडमी'चे घवघवीत यश

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुका येथील पारे सरांच्या सायन्स फोरम कोचिंग अकॅडमी,श्रीगोंदे मध्ये अपेक्षा बाळासाहेब पवार या विद्यार्थिनीने 90.00% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच निलेश प्रकाश राऊत या विद्यार्थ्याने गणित विषयात 100 पैकी 100 गुण मिळवून प्रथम (महाराष्ट्र राज्यात प्रथम) व सरोदे यशदीप या विद्यार्थ्यास बायोलॉजी विषयात 100 पैकी 99 गुण घेऊन क्लास मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे.(महाराष्ट्र राज्यात द्वितीय) बारावी बोर्ड परीक्षा 24 -25 परीक्षेत पारे सरांच्या क्लासेस मध्ये प्रथम अपेक्षा बाळासाहेब पवार 90%, द्वितीय अथर्व अशोक बक्षी ८9%, व संध्या वैजनाथ जगताप ८9%,तृतीय जगताप शांतनू सतीश ८८.67%,चौथा मदने सिद्धार्थ नवनाथ ८८.50%, पाचवा सरोदे यशोदीप ८6.50%, सहावा सांगळे तन्वी शरद ८6.33%, सातवा दिवटे श्रेया ८5.८3% व खरात जयदीप मारुती ८5.८3%, आठवा निलेश प्रकाश राऊत ८5.50% आणि नववा गलबले रवींद्र ८5.50% क्रमांक पटकावला आहे. पारे सरांच्या सायन्स फोरम कोचिंग अकॅडमी मध्ये गणित विषयात निलेश प्रकाश राऊत 100/100 , बेलेकर दीक्षा 99, आदित्य डोके 9८, शंतनू जगताप 97, यशदीप सरोदे 97 ,रवींद्र गलबले 97, जयदीप खरात 96, श्रेया दिवटे 96, संध्या जगताप 95 ,प्रवीण जगताप 95, कुरुमकर प्रतीक्षा 94, कवडे यश 94,अधोरे आरती 94,मदने सिद्धार्थ 94,तन्वी शरद सांगळे 94 गुण घेऊन उत्तीर्ण झाले...









सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सायन्स फोरम कोचिंग अकॅडमी तर्फे अभिनंदन करण्यात आले व विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच ːiology विषयात सरोदे यशदीप 99, शंतनू जगताप 97,अपेक्षा पवार 96, अथर्व बक्षी 96, जगताप संध्या 95, शेख अरबाज 93, रवींद्र गलबले 93,सांगली तन्वी 93, दिवटे श्रेया 93, मदने सिद्धार्थ 92, जगताप प्रवीण 92, गुणावरे आर्यन 92, आदेश दरेकर 92, आधोरे आरती 91, हांडे सौरभ 91 असे गुण प्राप्त केले आहेत.

फिजिक्स या विषयांमध्ये अपेक्षा बाळासाहेब पवार 93, जगताप संध्या 90, मदने सिद्धार्थ नवनाथ ८9, सरोदे यशदीप ८9, खरात जयदीप ८9, राऊत निलेश प्रकाश ८८ असे गुण प्राप्त केले आहेत. त्याचप्रमाणे केमिस्ट्री या विषया मध्ये गुणावरे आर्यन सोमनाथ 97, जगताप प्रवीण सतीश 97, पवार अपेक्षा 97, मदने सिद्धार्थ 95, जगताप शंतनू 95, बक्षी अथर्व 95, खरात जयदीप 94, जगताप संध्या 93, कुरुमकर प्रतीक्षा 92, सरोदे यशदीप 90, गिरमकर ऋतुजा 90 असे गुण प्राप्त करून विद्यार्थी उत्तीर्ण झाली आहेत.

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अकोले यांचे कार्यालय

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये)

## जाहीर समन्स

**अर्जदार : दूधगंगा ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या ; अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर**

**विरुध्द जाब देणार**

| अ.नं. | दावा क्र. | समन्स ज्याचेवर काढले त्याचे नाव कर्जदार | समन्स ज्याचेवर काढले त्याचे जामिनदाराचे नाव | दावा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | १६३ | **अंकूश नानासाहेब यादव**<br>मु.शेलद, पो.पाडाळणे, ता.अकोले, जि.अ.नगर | माधव बाळाजी तळेकर<br>शिवाजी लक्ष्मण नवले | ४८,०८८ + होणारे व्याज व इतर खर्च |
| २ | १६४ | **निवृत्ती पांडुरंग भवार**<br>मु.पो.साम्रद, ता.अकोले, जि.अ.नगर | मारुती पांडुरंग भवार<br>हिरामन गोविंद सोनवणे | ५,७९,१८१ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ३ | १६५ | **गोपीचंद मुरलीधर नाईकवाडी**<br>मु.पो.कारखाना रोड, अकोले ता.अकोले,जि.अ.नगर | बन्सी सदाशिव नाईकवाडी<br>अशोक गवराम आवारी | ३,१७,१७१ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ४ | १६७ | **अमोल भास्कर नाईकवाडी**<br>मु.पो.कारखाना रोड, अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर | संजय बाबुराव नाईकवाडी<br>रमेश काशिनाथ नाईकवाडी | ११,४३,६७९ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ५ | १६८ | **भास्कर गणपत भोर**<br>मु.पो.धामणगाव पाट, ता.अकोले, जि.अ.नगर | प्रविण तात्याबा धुमाळ<br>रेवचंद गणपत भोर | ३७,०३,७२४ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ६ | १६९ | **दिनकर गणपत भोर**<br>मु.पो.धामणगाव पाट, ता.अकोले, जि.अ.नगर | प्रविण तात्याबा धुमाळ<br>रेवचंद गणपत भोर | ३७,०३,७२४ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ७ | १७० | **चेअरमन, अमृतवाहिनी ॲग्रो कंपनी लि.टाकळी**<br>मु.पो.ता.अकोले, जि.अ.नगर | -<br>- | ८४,१९,८४८+ होणारे व्याज व इतर खर्च |
| ८ | १७१ | **रुपाली अमोल नाईकवाडी**<br>मु.पो.कारखाना रोड, अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर | साहेबराव सदाशिव नाईकवाडी<br>रमेश काशिनाथ नाईकवाडी | ११,२७,९९२ + होणारे व्याज व इतर खर्च |
| ९ | १७२ | **सागर सुभाष दिवे**<br>मु.पो.शेंडी, ता.अकोले, जि.अ.नगर | राजेश शिगंला राठोड<br>रमेश नाटू आहिरे | २१,१८,०९४ + होणारे व्याज व इतर खर्च |
| १० | १७३ | **अंकूश दत्तू तळेकर**<br>मु.पैठण, पो.आंभोळ, ता.अकोले, जि.अ.नगर | राजाराम बाळू तळेकर<br>बन्शी भाऊसाहेब फदाले | ४,१०,८०२ + होणारे व्याज व इतर खर्च |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोष्टाने समन्स पाठविणेत येवून दाव्याची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु प्रतिवादींना समन्स रुजू न झाल्यामुळे, त्याचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे, काही इसमांनी समन्स स्विकारणेस दिल्यामुळे व काही इसम नोटीस स्विकारुन सुनावणीस उपस्थित न राहील्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणने मांडणेसाठी स्वत: जातीने तारीख २९/०५/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधी या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदरचा जाहीर समन्स आज दि.२२/०५/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**सुनावणी ठिकाण: मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकोले यांचे कार्यालय छत्रपती संकुल, अकोले विविध कार्यकारी सेवा सोसायटी शेजारी, अकोले**

**(अमोल वाघमारे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, अकोले, जि.अहमदनगर**

# जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात येणार



**संगमनेर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सुगाव घटनेत मृत झालेल्या एस.डी.आर.एफ जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात येणार असल्याची माहीती महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

प्रवरा नदीपात्रात मृत झालेल्या तरूणाचा मृतदेह शोधण्यासाठी स्थानिक प्रशासनाने एस.डी.आर.एफच्या पथकाला पाचारण केले होते. सुगाव येथे पथक दाखल झाल्यानंतर त्यांनी शोधकार्य सुरू केले मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने या पथकातील पी.एस.आय प्रकाश नाना शिंदे, कॉन्स्टेबल राहूल गोपीचंद पावरा, वैभव सुनिल वाघ यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेन प्रशासन हादरले, ग्रामस्थांच्या मदतीने या तीन जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यापैकी पंकज पंढरीनाथ पवार, अशोक हिम्मतराव पवार यांना पुढील उपचकरा करीता स्थानिक रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेचे वृत्त समजल्या नंतर पालकमंत्री ना.विखे पाटील यांनी महसूल आणि पोलीस प्रशासनास सूचना देवून, मृत जवानांच्या कुटूबियांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना दिल्या. दुपारी स्वत: पालकमंत्री विखे पाटील, मा.आ.वैभव पिचड, राज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला, विशेष पोलीस महानिरीक्षक बी.जी.शेखर, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्यासह महसुल व प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

यासर्व मृत जवानांच्या पार्थिवावर मंत्री विखे पाटील आणि वरीष्ठ अधिका-यांनी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली अर्पण केली. पोलीस पथकाने शोकधून आणि बंदूकीची सलामी देवून मृतदेह त्यांच्या गावी रवाना करण्यात आले. याप्रसंगी जवानाचे नातेवाईक आणि त्याच्या सहका-यांना भावना आवरणे अवघड झाले होते. यासर्वांना मंत्री विखे पाटील यांनी दिलासा दिला.

यासर्व जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहीती ना.विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून, सर्व मृतदेह नातेवाईकांकडे रवाना करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. पाण्यामध्ये बुडालेल्या अन्य दोन व्यक्तिंचा तपास करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत असून, धरणातून पाण्याचा प्रवाहही आता बंद करण्यात आला आहे. याच कारणासाठी युवकांनी केलेल्या रस्ता रोको आंदोलनासही मंत्री ना.विखे पाटील यांनी भेट दिली. घटना घडल्यानंतर पाण्याचा प्रवाह कमी करण्याच्या सुचना आपण यापुवच दिल्या होत्या परंतू आंदोलकांच्या भावना लक्षात घेवून संपूर्ण प्रवाहच बंद करण्याच्या सुचना जलसंपदा विभागाला त्यांनी दिल्या.

## शेखर फराटे यांना साहित्य माणिक पुरस्कार जाहीर



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : मांडवगण फराटा येथील लेखक शेखर फराटे यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सार्वजनिक वाचनालय गोभणी ता. रिसोड जि. वाशीम यांचा सन २०२३ साठीचा 'साहित्य माणिक पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे. कथासंग्रह, काव्यसंग्रह, कादंबरी, समीक्षा संग्रह, आत्मकथन, बालसाहित्य, नाटक, ललित लेखसंग्रह, आणि गझलसंग्रह अशा नऊ प्रकारच्या साहित्य प्रकारातील उत्कृष्ट, उत्तमोत्तम साहित्यास 'साहित्य माणिक' पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी आलेल्या ११५ साहित्यकृतीतून कथासंग्रह प्रकारातील साहित्यासाठी लेखक शेखर फराटे यांच्या 'पारावरच्या गोष्टी' या कथासंग्रहाला पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मेहकर, जि. बुलढाणा येथे दि. १६ जून रोजी होणाऱ्या साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनामध्ये शेखर फराटे यांना प्रदान करण्यात येणार आहे. असे आयोजक, साहित्य संपादक भगवान राईतकर यांनी सांगितले.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर बलात्कार

मंचर (स. गांवकरी) : पारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावात अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवुन तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याची घटना दिनांक १८/१/२०२४ ते दिनांक ७/५/२०२४ चे दरम्यान घडली आहे. याबाबत सदर अल्पवयीन मुलीने पारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून गोकुळ राठोड रा. धुळे याच्यावर पारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पारगाव पोलिसांनी दिलेली माहिती अशी की आरोपी गोकुळ राठोड याने दिनांक १८/१/२०२४ ते दिनांक ७/५/२०२४ या काळात पीडित मुलगी घरी एकटीच असताना तिच्या कोपिमध्ये जाऊन तिला कॅडबरी खाण्यासाठी देऊन तिला म्हणाला की मला तू मला खूप आवडतेस, तुझ्यासोबत मला लग्न करायचे आहे, असे गोड बोलून बळजबरीने तिच्याबरोबर शरीर संबंध ठेवले व त्यानंतरही वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवून याबाबत घरच्यांना सांगितले तर तुला व तुझ्या आई वडिलांना मारून टाकेल असा दम दिला. याबाबत अल्पवयीन मुलीने पारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास पारगाव पोलीस करत आहेत.

## जवाहर विदयालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम





चांदा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील चांदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयाने याही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली असून विज्ञान विभागाचा १०० % तर कला शाखेचा ९४ % निकाल लागला आहे. बारावीच्या परीक्षेसाठी चांदा केंद्रात एकूण ४३८ विदयार्थी परीक्षेसाठी हजर होते त्यामध्ये जवाहर विदयालयाचे १९९ विदयार्थ्यांनी परीक्षा दिली होती . त्याचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहिर असून विज्ञान विभागाचा निकाल १०० % लागला आहे . तर या शाखेतील विदयार्थिनी अक्षरा महादेव थिटे हिने ४९५मार्कस मिळवत ८२ .५० % गुण मिळवत विदयालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कु . स्नेहा जालिंदर शेटे ८२ .१७ % द्वितीय ,. कु गायत्री विजय इंगळे ७८ .६७ % तृतीय , कु. ज्योति संजय दहातोंडे ७४ .१७ चतुर्थ, ,कु . वृषाली शिवाजी दहातोंडे ७६ .५० % गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला विज्ञान शाखेत पहील्या पाच मध्ये मुलींनीच बाजी मारली . तर कला शाखेत वैष्णवी कारभारी शिंदे ७६ .१७ % गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे द्वितीय कु सिमरन हारून शेख ७३ .८३ %, तृतीय कु. सुनिता राजेंद्र शिंदे ७२ .१७ % , चतुर्थ कु वैष्ठावी भाऊसाहेब काळे ६९ % व कु . स्वाती अशोक मोहिते ६९ % तर पाचवा क्रमांक कु. स्वाती रामा शिंदे ६८ % ६७ टक्के मिळवले आहेत .कला शाखेतही मुलींनींच बाजी मारल्याचे दिसत आहे . यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य हरीभाऊ जावळे , उपप्राचार्व रघुनाथ भोजणे , पर्यवेक्षक श्री कातोरे याच्यासह शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.



## सर्वांगीण दृष्ट्या ग्रामीण भाग विकासित होणे काळाची गरज - कैलास पवार

श्रीरामपुर (स. गांवकरी) : भूमी फाउंडेशन,महाराष्ट्र राज्य सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पवार व पदाधिकारी यांनी हिरडव ग्रामपंचायत तालुका लोणार जिल्हा बुलढाणा येथे सदिच्छा भेट दिली असता ग्रामपंचायत कार्यालय व पदाधिकारी यांच्या वतीने भूमी फाउंडेशन ही सामाजिक संस्था देश पातळीवर राज्यस्तरीय स्वरूपाचे करीत असलेल्या कार्याचा आदरपूर्वक गौरव करण्यात आला.या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पवार यांनी संस्थेच्या कार्याचा अहवाल आणि कार्य विशद केले तसेच ग्रामीण भाग आज सर्वांगीण दृष्ट्या विकसित झाला पाहिजे.शेती बरोबर प्रत्येक शेतकरी कुटुंबाला जोडधंद्याची गरज आहे.खेडी समृद्ध झाले तर देश सुखी होईल असे प्रतिपादन केले. यावेळी उद्योजक अशोकभाऊ घायाळ पाटील यांनी भूमी फाउंडेशन ने नव्याने सुरू केलेला आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींसाठी पुणे येथील निवासी प्रकल्प याची माहिती दिली. हा प्रकल्प अजून मोठ्या गतीने पुढे गेला पाहिजे यासाठी सर्वांनी सक्रिय सहभागी होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.तसेच यावेळी असंख्य ग्रामस्थांनी भूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कैलास पवार यांचे शाल श्रीफळ देऊन आपल्या गावात स्वागत केले.

## राहत्यात मोकाट कुत्र्यांच्या टोळक्याने पाडला पाच बकऱ्यांचा फडशा

राहाता (स. गांवकरी) : राहाता व साकुरी परिसरात भटक्या व मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली असून मोकाट कुत्र्यांच्या टोळीने राजेंद्र मशनरी स्टोअर्स मागील शेतातील एका पशुपालकाच्या पाच शेळ्यांचा फडशा पाडला आहे यामध्ये पशुधन पालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे मोकाट कुत्र्यांचा मोठा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे रस्त्यावरून मार्ग क्रमांक करताना दुचाकी स्वार तसेच इतर वाहनांना अचानकपणे कुत्रे आडवे येतात यामुळे छोटे-मोठे अनेक अपघात घडताहेत अशा प्रकारच्या अपघातात अनेक दुचाकी स्वर घसरून पडले आहेत त्यात गंभीर स्वरूपाची दुखापत दुचाकी सरांना होते तसेच गाडीचेही मोठे नुकसान होते काहींना यामुळे यापूर्वी देऊ शकता गमव लागण्याच्या घटना घडल्या आहेत रस्त्यावरून ये जा करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक तसेच महिला मुले यांच्या जवळ बेसावध पणे येऊन कुत्रे चावे घेऊन नागरिकांना जखमी करतात ग्रामीण रुग्णालयात कुत्रे चावल्यानंतर इंजेक्शन घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्याची प्रमुख कारण मोकाट कुत्रे वाढल्याचे आहे प्रशासनाने तातडीने या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या 10 गोवंश जनावरांची सुटका

नाशिक : (समर्थ गांवकरी)

शहररात गोवंश जनावरांची कत्तल करणारे व त्यांचे मांस विक्री करणारे आरोपीतांवर कडक कारवाई करणेबाबत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या सह वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते यांची नाशिक शहर आयुक्तालय कार्यक्षेत्रात गोवंशीय जनावरांची कत्तल व त्यांची मांस विक्री करावयाचे कारवाई बाबत नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करून प्रशांत बच्छाव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) व डॉ. सिताराम कोल्हे, सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करणेबाबत आदेशीत केले आहे.



गुरुवारी दि.२४ रोजी रात्री गुंडा विरोधी पथकाचे पोलीस अंमलदार रात्रगस्त करीत असतांना पोलीस हवालदार विजय सुर्यवंशी यांना माहिती मिळाली की, वडाळागांव इंदिरानगर येथे चारचाकी वाहनामध्ये गोवंशीय जातीचे जनावरे कत्तलीसाठी येणार आहे. सदर बातमी गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी सपोनि / ज्ञानेश्वर मोहिते यांनी वडाळागांव , इंदिरानगर परिसरात सापळा रचला असता. शुक्रवारी दि.२५ रोजी सकाळी ०७.३० वा. इसम नामे अक्रम शेख यांच्या मालकीची जागा बिस्मिल्लाह लॉन्स समोरील पत्रेचे शेड मध्ये, वडाळा गांव, नाशिक येथे आरोपी नामे १) रिझवान नुरआलम शेख वय २६ रा. चौक मंडई बिरबल आखाड्या जवळ नाशिक २) अय्याज फैय्याज बागवान यय ४० वर्षे रा. बागववान पुरा नाशिक यांनी एक पिकअप बलेरो चार चाकी वाहन क्रंमाक MH-06-:W-2016 मध्ये १० गोवंश जातीचे जनावरे बेकायदेशीर रित्या कत्तलीसाठी आणली सदरची गोवंश जातीची जनावरे आरोपी नामे १) सददाम बबलु कुरेशी २) नदीम चाँद शेख ३) अजीज कदीर कुरेशी यांचे सांगणे वरुन गिरणारे परीसरातुन कत्तलीसाठी आपले होते. त्यावेळी गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचुन शिताफीने आरोपी नामे १) रिझवान नुरआलम शेख, २) अय्याज फैय्याज बागवान यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातील कत्तलीसाठी आणलेले १० गोवंश जातीचे जनावरांची सुटका करून तपोवन येथील गोशाळेमध्ये जमा केले. सदर आरोपीतांनी महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश जनावरांची हत्या बंदी कायदा लागु असतांना सदर कायदयाचे उलंघन करून गोवंश जातीची जनावरे बेकायदेशीरित्या कत्तलीसाठी आणली म्हणुन इंदिरानगर पोलीस ठाणे येथील महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, पोलीस अंमलदार विजय सूर्यवंशी, अक्षय गांगुर्डे, मलंग गुजांळ, डी. के. पवार, सुनिल आडके, राजेश सावकार, निवृत्ती माळी, प्रविण चव्हाण, नितीन गौतम, गणेश नागरे, प्रदिप ठाकरे, गणेश भागवत यांनी संयुक्तरित्या कामगिरी पार पाडली आहे.

## जाब विचारल्या प्रकरणी विवाहितेची आत्महत्या

मंचर : (समर्थ गांवकरी)

रात्रीच्या वेळी मोबाईलवर कोणाशी चॅटिंग करते, याचा जाब पती आणि माहेरच्यां नातेवाईकांसमोर तिला विचारला असता, 34 वर्षीय पुनम जिग्नेश शिंदे या विवाहित महिलेने पळत जाऊन बिल्डिंग वरून उडी मारून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना मंचर तालुका आंबेगाव येथे गुरुवार दि. 23 रोजी सायंकाळी साडेचार वाजता घडली आहे याप्रकरणी मंचर पोलिसांची आकस्मित मृत्यू नोंद केली असून या घटनेचा तपास सुरू करण्यात आल्याचे मंचर पोलिसांनी सांगितले. याबाबत मंचर पोलिसांनी दिलेली माहिती अशी खबर देनार नरेंद्र निघोट हे कुटुंबासमवेत अष्टविनायक सोसायटी मंचर डोबीमळा ता. आंबेगाव येथे राहत असून त्याच सोसायटीमध्ये दुसऱ्या मजल्यावर त्यांची बहीण पुनम जिग्नेश शिंदे, तिचा पती व मुलासोबत राहण्यास आहे. गुरुवार दि.२३ रोजी पहाटे तीन वाजता फिर्यादी निघोट यांचे मेहुणे जिग्नेश शिंदे हे पत्नी पूनम व मुलगा मयंक यांना सोबत घेऊन त्यांच्या घरी आले व त्यांनी तुझी बहीण ही दुसऱ्या मुलासोबत मोबाईल वरती रात्री उशिरापर्यंत चॅटिंग करत असते असे सांगितले. त्यावेळी नरेंद्र निघोट यांनी त्यांना घरात घेत आपण काय आहे ते सकाळी पाहू असे सांगितले.

त्यानंतर सकाळी त्यांनी त्यांचे नातेवाईक यांना मंचर येथे बोलावून घेतले व जिग्नेश व बहीण पूनम यांच्याशी चर्चा केली. पुनम ज्याच्या सोबत मोबाईल वर चॅटिंग करत होती. तो मुलगा खडकी पिंपळगाव येथील असल्याने त्याला फोन केला असता तो सायंकाळी पाच वाजता तुमच्याकडे येतो, असे सांगितले.

## गौतम बुद्ध यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

शहरातील सिद्धार्थनगर येथे आयोजक बौद्ध धम्म यात्रा समिती सिद्धार्थ नगर, ससाने नगर, श्रीगोंदा यांच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. याबाबत समितीचे पदाधिकारी शिवा आप्पा घोडके, डॉक्टर प्रदीप घोडके, रावसाहेब घोडके यांनी माध्यमांना माहिती दिली आहे. सकाळी जयंतीनिमित्त पंचशील व त्रिसरण ग्रहण करत उपस्थित मान्यवरांच्या शुभेच्छा संदेशानंतर शहरात सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ससाणे नगर, सिद्धार्थ नगर व शहरातील नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. श्रीगोंदा शहरात ठिकठिकाणी पदाधिकाऱ्यांनी प्रतिमांना अभिवादन करत शुभेच्छा व्यक्त केल्या. दरम्यान विद्यालयीन मुलींनी गीतांवर



लेझिम नृत्य सादर केले.

दुपारी सिद्धार्थ नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनमध्ये सर्व समाज बांधवांनी एकत्रित येत अन्नदान केले. या कार्यक्रमासाठी थोर दानशूर व्यक्तिमत्व व वृद्धेश्वर बँकेचे संचालक वाडगे भाऊसाहेब यांनी धम्मदान दिले. त्यातून कार्यक्रमासाठी अन्नदान करण्यात आले. नमुद कार्यक्रमासाठी शिवा आप्पा घोडके, रावसाहेब घोडके, डॉक्टर प्रदीप घोडके, जिवाजी घोडके, बोधाचार्य आनंद घोडके, संजय घोडके, नितीन कांबळे, भारत स.घोडके, गोरख तात्या घोडके, अरविंद पवार, अजय घोडके, बाळासाहेब घोडके, सह भारतीय बौद्ध महासभा युनिट श्रीगोंदा यांनी सहभाग नोंदवला.

सकाळी आयोजित करण्यात आलेल्या धम्मविधी व पूजा पाठ कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली. यावेळी समता सैनिक दलाने आपली कवायत सादर केली. या प्रसंगी जिवाजी घोडके, प्रशांत गोरे, अनिल ठवाळ, अमर घोडके, भागचंद घोडके, डॉ.अनिल घोडके, दीपक घोडके, संदीप उमाप, अजय घोडके, दिपक रा.घोडके, रमेश मखरे, चेअरमन अशोक घोडकेंसह बौद्ध धम्म यात्रा समिती सिद्धार्थ नगर/ससाणे नगर, व स्थानिक नागरिक, ग्रामस्थ व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "आजचा निश्चय पुढचं पाऊल" ही मराठा महासंघाची संकल्पना कौतुकास्पद

### पद्मश्री पोपटराव पवार यांचे गौरवोद्गार

नगर : (समर्थ गांवकरी)

मराठा समाजातील विविध घटकांना मार्गदर्शन करुन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघ राबवित असलेली "आजचा निश्चय पुढचं पाऊल" ही पुस्तिका मराठा समाजाला दिशादर्शक ठरणार असून हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार पद्मश्री पोपटराव पवार यांनी काढले

अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या तसेच मराठा समाजाच्या विविध घटकांना मार्गदर्शन ठरणार्या "आजचा निश्चय पुढचं पाऊल" या पुस्तिकेचे प्रकाशन राज्यातील विविध जिल्ह्यांत होत आहे नगर जिल्ह्यातही आदर्श गाव हिवरेबाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते नुकतेच या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले या वेळी पवार यांनी या पुस्तिकाचा आढावा घेतला या वर प्रतिक्रिया देताना पोपटराव पवार म्हणाले बहुजन समाजामध्ये मराठा समाजाची भुमिका मोठ्या भावांची राहीली आहे या समाजातील विविध घटकांना मार्गदर्शन करुन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या उन्नतीसाठी मार्गदर्शन करण्याची गरज होती ती आज या पुस्तकांच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याचे दिसत आहे या पुस्तकांचा मोठा फायदा मराठा समाजाला होणार आहे समाजातील तरुणांसाठी आण्णासाहेब पाटील विकास महामंडळ च्या माध्यमातून कर्ज वाटप व सारथी सारख्या योजनांतून समाजातील मुला मुलींसाठी शिक्षणासाठी प्रोत्साहन यात मराठा महासघाचा असणारा सहभाग हा समाजाच्या उन्नतीचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले

स्वर्गीय आण्णासाहेब पाटील यांचे मराठा समाजासाठी चे योगदान न विसरता येणारे आहे




समाजातील विविध घटकांनी या पुस्तकाचे वाचन करुन अनुकरण करण्याची गरज असून मराठा समाजातील तरुणांना मार्गदर्शन करणारी अखिल भारतीय मराठा महासंघ ही एकमेव संघटना असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले सारथी सारख्या मराठा समाजाला शिक्षण क्षेत्रात पुढें नेण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या या संस्थेची पाहिली बैठक हिवरेबाजार येथे झाल्याची आठवण पवार या वेळी करुन दिली

यावेळी "आजचा निश्चय पुढचं पाऊल" या पुस्तकात बाबद जिल्हा सरचिटणीस रमेश बोरुडे यांनी सविस्तर माहिती दिली जिल्हा अध्यक्ष शिवाजी डौले, राहुरी तालुका अध्यक्ष दिनकर पवार, जिल्हा सल्लागार ॲड सयाराम बानकर, राहुरी शहराध्यक्ष प्रदीप भुजाडी, तालुका कार्याध्यक्ष विलास वराळे,सोशल मीडिया जिल्हा प्रमुख रविंद्र येवले, प्रेस फोटोग्राफर चंद्रकांत टिके, जामखेड तालुका अध्यक्ष प्रविण पवार तसेच हिवरेबाजार येथील ग्रामस्थ उपस्थित होते.



## जगण्यातील सकारात्मकता देते परिस्थितीशी संघर्ष करण्याची उमेद

- माधुरी ताम्हणे यांचे मत
- वंचित विकास संस्थेतर्फे 'अभया'चा दहावा वर्धापनदिन व दशकपूर्ती 'अभया सन्मान' सोहळा

पुणे : (समर्थ गांवकरी)

"समाजातील प्रत्येक महिला विविध घाव सोसत असते. प्रत्येकीच्या संघर्षाचे स्वरूप वेगळे असेल. पण जीवनात संघर्ष येतोच. अशावेळी आपल्या जगण्यातील सकारात्मकता, धैर्याने सामोरे जाण्याची वृत्ती आणि मनातील कणखरपणा परिस्थितीशी दोन हात करण्याची उमेद देतो," असे मत लेखिका श्रीमती माधुरी ताम्हणे यांनी व्यक्त केले.

वंचित विकास संचालित 'अभया' या एकल महिलांच्या मैत्रीगटाचा दहावा वर्धापनदिन व दशकपूर्ती अभया सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. कर्वे रस्त्यावरील अश्वमेध हॉलमध्ये झालेल्या उन्मेष प्रकाशनच्या संचालक श्रीमती मेधा राजहंस, वंचित विकासचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह संचालक मीना कुर्लेकर, संचालिका सुनीता जोगळेकर, मीनाक्षी नवले आदी उपस्थित होते.

# समस्या सोडवा नाहीतर काम सोडा : आ. प्रा. फरांदे

### वीज वितरण अधिकाऱ्यांना निर्वाणीचा इशारा

नाशिक : (समर्थ गांवकरी)

शहराचे तापमान ४१ अशांच्या वर गेल्याने दिवस-रात्र प्रचंड उकाडा वाढला आहे. त्यातच इंदिरानगर परिसर ते डिजीपीनगर परिसरात २२ तास लाईट नसल्याने नागरिक उकड्याने हैराण झाले होते..

गेल्या अनेक दिवसापासून वीज समस्येमुळे नागरिकांना त्रास लक्षात घेता प्रा.देवयानी फरांदे यांनी अधीक्षक अभियंता पडळकर यांच्याकडे प्रभाग क्र २३ व ३० मधील लोकप्रतिनिधी व प्रमुख भाजपा पदाधिकारी व नागरिकांना समवेत विद्युत भवन या कार्यालयात जाऊन अधीक्षक अभियंता पडळकर यांना खडे बोल सुनवत प्रभाग क्र २३ व ३० च्या समस्या निर्दशनास आणून त्यांना अल्टीमेट दिला.यावेळी आ. फरांदे यांनी १) त्वरित स्टॅन्ड बाय फिडर लावण्यात यावे.२) ३३ KV केबल लाईन ओवर हीट झाल्याने ठिकठिकाणी खराब झालेली आहे. तात्काळ ३३ KV ची नवीन लाईन टाकण्यात यावी.3) अनधिकृत वीज जोडणी त्वरित बंद करावी ४) नवीन बिल्डिंगला ट्रांसफार्मर सक्तीचा करावा.५) इंदिरानगरला कामे करण्यासाठी स्टाफ कमी पडत असेल तर अन्य ठिकाणचा स्टाफ बोलावून तात्काळ कामे करून घ्यावीत.६) JE सोनगीरे यांची बदली करावी व त्याची खाते निहाय चौकशी



करावी.७) अधिकारी फोन उचलत नाही. उचलला तर उडवा उडवीची उत्तरे देतात. त्यांना योग्य समज द्यावी अन्यथा त्याच्यावर कार्यवाही करावी. फोन वर माहिती देण्यासाठी स्वतत्र व्यक्तीची नियुक्ती करावी.

संपूर्ण इंदिरानगर परिसर व अशोकमार्ग या ठिकाणी नवीन मोठ्या टॉवर्स बिल्डिंग झाल्याने वीज ग्राहक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने समस्या वाढलेल्या आहेत.सर्व समस्याची सोडवणूक करण्यासाठी शासन स्तरावर कोणतीही मदत किंवा निधी लागल्यास ताबडतोब मदत केली जाईल असे यावेळी आ. फरांदे यांनी सांगितले. यावेळी अनेल सोसायटी मधील नागरिकांनी त्यांचे प्रश्न मांडले अधीक्षक अभियंता पडळकर यांनी समस्या आहेत. त्या सोडविण्याचा प्रयत्न नक्की केला जाईल. आपल्याला झालेल्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त करत पुन्हा आशा चुका होणार नाहीत आम्ही लक्ष देऊन काम करू असे आश्वासन यावेळी आ.देवयानी फरांदे यांना नागरिकां समोर दिले. यावेळी श्री.वाडे, कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी, श्री.भांबर, कार्यकारी अभियंता महावितरण कंपनी, अधिकाऱ्यां समवेत माजी महापौर सतीशनाना कुलकर्णी, श्याम बडोदे, सतीशबापू सोनवणे,सुनील देसाई,चंद्रकांत खोडे,सचिन कुलकर्णी,यशवंत निकुळे,सुनील खोडे,संध्या कुलकर्णी,अजिक्य साने,जितेंद्र चोरदिया,दत्ता शिंदे,सोनाली कुलकर्णी,मंगेश नाईक,नितीन बांडे, हेरंभ सोनटक्के, हेमंत मोडक, लक्ष्मण कवरे, केदार जोशी, शुभम चौहान,तुकाराम शिरुडे, शेखर पाटील , नितीन पाटील , धर्मा भावसार, विवेक बागुल , जगन्नाथ शिरसाट , आर के पाटील, विजय पवार , मधुकर पाटील , रामचंद्र वाडे , पंकज गोरे , उत्तमराव गोसावी , सुधाकर अमृतकर , सुरेंद्र पवार, सोनवणे काका , मृणाल जोशी ,कांगले काकू ,सुधा देशपांडे , नयना ढोकणे, संजय जगले,ओंकार जगळे, सुधाकर वारे, दिलीप चव्हाण,संजय करंदीकर,भगवान जाधव, भास्कर पाटील,स्मिता कंगले,मृणाली जोशी,शोभा नागरे,अविनाश कुलकर्णी, सचिन गुलाटी आदी सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आता पोटावरील क्लिष्ट प्रक्रीयांसह अवयव प्रत्यारोपण शक्य

## एन्डोस्कोपी, गॅस्ट्रोस्कोपी, कोलोनोस्कोपीसह ईआरसीपी चाचण्यांना सुरुवात

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



गेल्या काही दिवसांपूर्वी पोट व यकृत (लिव्हर) संबंधित आजार असलेल्या रुग्णांना इतरत्र जाऊन उपचार घ्यावे लागत होते. रुग्णसंख्येचा वाढता आलेख यामुळे रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी नुकताच एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ पोटविकार विभाग सुरु करण्यात आला आहे. याठिकाणी एन्डोस्कोपी, कोलोनोस्कोपी व ईआरसीपी प्रक्रियांना सुरुवात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पोटविकार विभागाची बाह्यरुग्ण सेवा आठवड्यातून दोन दिवस नाशिक येथील क्लिनिकमध्येही सुरु करण्यात आली असून याठिकाणी रुग्णांना उपचार घेता येणार आहेत. याबाबतची माहिती हॉस्पिटल प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

इगतपुरी तालुक्यातील धामणगाव-घोटी येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये नाशिकसह जळगाव, भुसावळ, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, बुलढाणा, जालना, भंडारा गोंदियासोबतच ठाणे, पालघर व मुंबईच्या विविध भागांतून रुग्ण उपचारासाठी येत असतात. याठिकाणी पूर्णवेळ पोटविकार तज्ञ याठिकाणी उपलब्ध होत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत होती. मात्र, गेल्या महिन्यापासून तज्ञ व अनुभवी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव आंबर्डेकर पूर्णवेळ याठिकाणी उपलब्ध झालेले असून पोटावरील वेगवेगळ्या स्कोपीसह क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी ते करू लागले आहेत.

सद्यस्थितीत एसएमबीटीमध्ये अद्ययावत गॅस्ट्रोस्कोपी, कोलोनोस्कोपीसह ईआरसीपीद्वारे विना शस्त्रक्रिया पोटासंबंधित आजारांचे निदान व उपचार करणे सहज शक्य झाले आहे.

यासोबतच अत्याधुनिक फायब्रोस्कॅन ज्याद्वारे लिव्हरची इजा ओळखता येते ही सुविधा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांवर याठिकाणी शासकीय योजनेच्या माध्यमातून मोफत तर योजनेत न बसणाऱ्या रुग्णांवर याठिकाणी अल्पदरांत उपचार केले जात आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे चॅरीटेबल हॉस्पिटल असलेल्या या हॉस्पिटलमध्ये सद्यस्थितीत २५ पेक्षा अधिक स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी विभाग सुरु झाले आहेत. एसएमबीटी हॉस्पिटलला नुकतेच सर्वोच्च रुग्णसेवेचा मापदंड समजल्या जाणाऱ्या एनएबीएच संस्थेची प्राथमिक मान्यतादेखील मिळाली आहे.

रुग्णांना यकृत प्रत्यारोपणाची (लिव्हर ट्रान्सप्लांट) माहिती मिळावी यासाठी डॉ. आंबर्डेकर एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दररोज व नाशिक येथील बाह्यरुग्ण विभागात अवयव प्रत्यारोपणावर विशेष मार्गदर्शन करत आहेत. यासोबतच पचनसंस्थेशी निगडित सर्व प्रकारच्या सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे रुग्णांची गैरसोय यामुळे टळलेली आहेत.

नाशिकमध्ये दर बुधवार आणि शुक्रवारी पोटविकार विभागाची बाह्यरुग्ण सेवा सुरु करण्यात आली आहे. यादरम्यान, पोटासंबंधित आजारांवर सल्ला व मार्गदर्शन केले जाते.

यासोबतच अतिशय कमीत दरांत रुग्णांना औषधेदेखील उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

पोटामध्ये वेदना होणे, गिळायला त्रास होणे, गिळता न येणे, अचानक वजन कमी होणे, भूक कमी लागणे, छातीमध्ये व पोटामध्ये जळजळ होणे, वारंवार अतिसार (डायरिया) होणे, बद्धकोष्ठता, उलट्या व रक्ताच्या उलट्या होणे, काळी संडास, संडासातून रक्त येणे, कावीळ, पित्ताशयातील खडे व पित्तनलीकेतील खडे, यकृताचे विकार, स्वादूपिंडाचे विकार, पोटातील आतड्याला सूज येणे इत्यादी.

### आजार अंगावर काढू नका

एसएमबीटी हॉस्पिटलच्या पोटविकार विभागात यकृत रुग्णांमध्ये गळ्याखाली फुगलेल्या नसांवर बॅंडिंग करणे, अन्ननलिकेत किंवा पोटामध्ये गिळलेल्या पिन, चुंबक, बॅटरी, काटे व तत्सम गोष्टी पोटातून काढणे, अन्ननलिकेचा अडथळा दूर करणे, अन्ननलिका, पोट, यकृत, स्वादुपिंड, मोठे आतडे यांचा कर्करोग-निदान व उपचार करणे, अन्ननलिका व पोट व आतडे यातून होणारा रक्तस्राव रोखणे, निदान व उपचार, पित्तनलिका व स्वादुपिंडातील खडे व अडथळे ईआरसीपीद्वारे दूर करणे इत्यादी उपचार केले जात आहेत. आजार अंगावर न काढता तत्काळ उपचार घेतल्यास कुठलाही आजार बरा होतो.

**- डॉ. प्रणव आंबर्डेकर, पोटविकार तज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल**

## बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : कोळगावमध्ये 2568 वी बुद्ध पौर्णिमा सकल समाजाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी धम्म प्रार्थना, धम्म सुत्त घेण्यात आले. दरवर्षी कोळगाव मध्ये बुद्ध पौर्णिमा बौद्ध समाजाच्या वतीने मोठ्या प्रमाणात व विविध कार्यक्रमांनी साजरी केली जाते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोळगाव चे सरपंच पुरुषोत्तम लगड व प्रमुख पाहुणे ओंकार नलगे उपस्थित होते. बौद्धाचार्य भारत आल्हाट यांनी याप्रसंगी त्रिशरण, पंचशील, भीम उपासना व सुत्त या प्रार्थने द्वारे तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उपासना करण्यात आली. त्यानंतर सर्वांना खीर वाटप करण्यात आली. याप्रसंगी पत्रकार महेशकुमार शिंदे, सरपंच पुरुषोत्तम लगड यांनी समाज प्रबोधन केले. यावेळी धनश्री लगड ,ओंकार नलगे, ग्रामपंचायत सदस्य चिमणराव बाराहाते, जयराज लगड, प्रदीप आढाव, प्रतिभा धस, शिवराज देशमुख, शोभा उजगरे, सुनीता उजगरे, छाया उजगरे, रेखा उजगरे, मीना उजगरे ,सारिका उजगरे ,राणी उजगरे ,स्वाती उजगरे ,सोनाली उजगरे ,प्रियांका अक्षय उजगरे, एकता उजगरे, माया उजगरे ,रंजना उजगरे ,ज्योती हेमंत उजगरे ,पल्लवी उजगरे, संगीता उजगरे, प्रमिला उजगरे ,रिटा उजागरे, लता उजगरे ,आशा पवार, अर्चना उजगरे ,भारती उजगरे, रेश्मा उजगरे, मनोरमा भोसले, कुंदा उजगरे, कांताबाई उजगरे, निकिता उजगरे, शकुंतलाबाई उजगरे, संगीता उजगरे, प्रियंका निलेश उजगरे तसेच संदीप उजगरे, अनुप उजगरे, श्रीकांत उजगरे ,काळूराम उजगरे , प्रणत उजगरे, हेमंत उजगरे, किरण उजगरे ,नंदू उजगरे, अक्षय उजगरे, वैभव उजगरे, रितेश पवार, नागेश उजगरे, सनी उजगरे ,सन्मान उजगरे, विकास उजगरे ,चंद्रकांत उजगरे, श्याम भोसले, अंकित उजगरे, राजेश उजगरे, हरीश उजगरे , सतीश उजगरे,रवींद्र उजगरे प्रवीण उजगरे, उपस्थित होते. या कार्यक्रमास लग्न वाढदिवसाच्या निमित्ताने अन्नदानासाठी ज्योती आणि संतोष उजगरे यांनी मदत केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विलास उजगरे यांनी केले.

## वाठोडा शुक्लेश्वर येथे उद्या नि:शुल्क निसर्गोपचार आरोग्य शिबिराचे आयोजन

अमरावती (स. गांवकरी) : स्थानिक विश्वकर्मा कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी अॅन्ड योगिक सायंस, महाविद्यालयाच्यावतीने रविवार दिनांक 26 मे रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 या दरम्यान निसर्गोपचार नि:शुल्क आरोग्य तपासणी व रोग उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. व्यस्त जीवनशैलीत डिप्रेशन, भय, लठ्ठपणा, मायग्रेन, मधुमेह, सायटिका, मणक्याचे आजार, डोकेदुखी अशा अनेक शारीरिक तथा मानसिक समस्यांवर विनाऔषधी उपचार करणे ही आजची गरज आहे जेणेकरून वारंवार औषधोपचारामुळे शरीरावर होणा-या दुष्परिणामांना सामोरे जावे लागणार नाही. त्याकरिता प्रत्येक रुग्णांच्या नाडी परीक्षणाची गरज लक्षात घेऊन व समाजस्वास्थ्य हा उद्देश लक्षात ठेवून या शिबिराचे नि:शुल्क आयोजन वाठोडा शुक्लेश्वर येथे करण्यात येत आहे.

## तिघांचा मृत्यू,पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद, खळबळ

**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव शहर आणि तालुक्यात उन्हाने कहर केला असून उष्याचे नवनवे विक्रम प्रस्थापित होत असून यातून अनेक अनर्थ उघड होत असून यातून तीन इसमांचा मृत्यू झाला असल्याचा कयास व्यक्त होत आहे.यात साधारण ६०-६५ वर्ष वयाचे दोन व एक ५० वर्षाच्या पुरुषांचा समावेश आहे.यात पहिली खबर शीतल प्रकाश पहाडे यांनी दिली असून दुसरी खबर अमित साहेबराव खोकले यांनी दिली आहे.तर तिसरी नोंद पोलिसांनी केली असून यातील तिघांची अद्याप ओळख पटलेली नाही.

भारतातील मार्च-मे दरम्यान उन्हाळा अधिक उष्ण असण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली होती. तीन महिन्यांच्या कालावधीत देशातील बहुतांश भागांमध्ये "सामान्यतेपेक्षा जास्त" कमाल आणि किमान तापमानाचा अंदाज वर्तवला आहे.वर्तमानात अरब राष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर उष्ण लाटा आल्याने त्याचे प्रतिकूल परिणाम दिसून येत आहे.दोन दिवसात पूर्वेकडे वाहणारा वारा सुरू झाल्याने हवेतील उष्णता कमी झाल्याचा आभास होत असला तरी वर्तमान तापमान सजीव सृष्टीस भाजून काढत आहे.

## पुन्हा 700 ब्रास वाळू जप्त : मेहकर, लोणार येथे 14 टिप्परवर कारवाई

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातील अवैध वाळू विरोधात कारवाई सुरूच आहे. यात संग्रामपूर आणि सिंदखेडराजा तालुक्यात कारवाया करण्यात आल्या. या कारवाईत 700 ब्रास अवैध वाळू जप्त करण्यात आली असून मेहकर, लोणार येथे 14 टिप्पर वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

काल सायंकाळी उशिरा नारायणखेड येथील अवैध साठा करण्यात आलेली 400 ब्रास वाळू आढळून आली. महसूल विभागाने ही वाळू जप्त करून कारवाई केली. तसेच खिरोडा, ता. संग्रामपूर येथे 300 ब्रास वाळूचा साठा निदर्शनास आला. या ठिकाणीही सदर वाळू जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. शुक्रवारी, दि. 24 मे रोजी विशेष मोहिमेदरम्यान मेहकर व लोणार तालुक्यामध्ये विना नंबर प्लेट 14 टिप्पर वाहनांवर कारवाई करण्यात आली. यात सुमारे 1 लाख 33 हजार 500 रुपये एकूण दंडाची रक्कम वसूल करण्यात आली. परिवहन विभागाचे सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक रितेश चौधरी, सुरेखा सपकाळ, अनुजा काळमेघ यांनी ही कारवाई केली.

आज चांगेफळ, ता. संग्रामपूर गावानजीक अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला. पंचनामा करुन सदर ट्रॅक्टर तामगाव पोलीस स्टेशन येथे देण्यात आला आहे.

गावांमध्ये अवैध वाळूचा साठा करण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांमधील कारवाईदरम्यान याबाबी समोर आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी यांनी तलाठी, मंडळ अधिकारी त्यांच्या सहकार्याने गावांमध्ये करण्यात येणाऱ्या अवैध वाळूसाठाची माहिती घेऊन कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

## दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या रेकॉर्डवरील चौघांना पकडले

### नगर एलसीबी टिम'ची कारवाई

**अहमदनगर : (समर्थ गांवकरी)**



लिंक रोड अहमदनगर परिसरामध्ये दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या ४ रेकॉर्डवरील आरोपींना पकडण्यात 'नगर एलसीबी' लाख यश आले आहे. ओसवाल इंपिरियअल चव्हाण (वय २८, रा. वाळुंज पारगांव, ता. जि. अहमदनगर), डेग विठ्ठल भोसले (वय २९, रा. आनंद चिखली, ता. आष्टी, जि. बीड, हल्ली रा. वाळुंज पारगांव, ता. जि. अहमदनगर), तुषार उर्फ नुटल्या इंपिरिअल भोसले (वय ३३, रा. वाळुंज पारगांव, ता. जि. अहमदनगर), नागेश रेजा काळे (वय २५, रा. वाळुंज पारगांव, ता. जि. अहमदनगर) अशी पकडण्यात आलेल्यांची नावे आहेत. एसपी राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, नगर शहर डिवायएसपी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोनि दिनेश आहेर यांच्या सूचनेनुसार एलसीबीचे पोउपनि तुषार धाकराव, पोलीस अंमलदार बबन मखरे, दत्तात्रय हिंगडे, मनोहर गोसावी, बापुसाहेब फोलाणे, रविंद्र कर्डीले, गणेश भिंगारदे, संदीप दरंदले, संतोष खैरे, विजय ठोंबरे, रविंद्र घुंगासे, रोहित मिसाळ, मेघराज कोल्हे, संभाजी कोतकर आदिंच्या टिम'ने ही कारवाई केली. याबाबत समजलेली माहिती अशी की, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार नगर जिल्ह्यातील चोरीचे गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढत असताना पोनि श्री. आहेर यांना दि.२४ मे २०२४ रोजी ओसवाल इंपिरियल चव्हाण (रा. वाळुंज पारगांव, ता. जि. अहमदनगर) हा त्याचे ४ ते ५ साथीदारांसह दोन दुचाकीवर येऊन कल्याण रोड ते केडगांव जाणारे लिंक रोडजवळ गायके मळ्याकडे जाणारे रोडला असलेल्या ओढ्यालगत अंधारामध्ये थांबुन कोठेतरी दरोडा घालण्याचे तयारीत थांबलेले असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

## नगर अर्बन खातेदार व ठेवीदारांना बँकेच्या वतीने महत्त्वाचे आवाहन

**अहमदनगर : (समर्थ गांवकरी)**

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खातेदार व ठेवीदारांनी त्यांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम डी आय सी जी सी क्लेमच्या माध्यमातून परत मिळवण्यासाठी आपापली केवायसी कागदपत्रे बँकेकडे जमा करणेबाबत यापूर्वी बँक प्रशासनाने अनेकदा आवाहन करून देखील अद्याप अनेक ठेवीदार व खातेदारांनी आपले केवायसी कागदपत्रे बँकेकडे जमा न केल्यामुळे संबंधितांना रकमा परत करण्यात अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे सर्व ठेवीदार व खातेदारांना पुन्हा आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपापली केवायसी कागदपत्रे व क्लेम फॉर्म बँकेच्या नजीकच्या शाखेत अथवा मुख्यालयात १८ जून २०२४ पर्यंत जमा करावेत. सदर कागदपत्रे मुदतीत जमा न केल्यास खात्यातील रकमेचा दावा घेण्यास संबंधित खातेदार इच्छुक नसल्याचे व भविष्यात त्यावर दावा करणार नसल्याचे समजण्यात येईल. त्याच बरोबर बँकेच्या सर्व थकीत कर्जदार व जामीनदारांनी देखील आपापल्या कर्ज खात्यावरील थकबाकी रक्कम लवकरात लवकर भरून बँक प्रशासनास सहकार्य करावे व संभाव्य कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

# ....या संशोधकास अमेरिकेत पेटंट प्राप्त !

**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**



मूळ सावळीविहिर येथील रहिवासी मात्र वर्तमानात कोपरगाव येथे अधिवास असलेले जलसंपदाचे माजी उपविभागीय अभियंता भास्कर सुरळे यांचे चिरंजीव डॉ.हेमंत भास्कर सुरळे हे आंतरराष्ट्रीय मेटा कंपनीत (फेसबुक) संशोधक म्हणून कार्यरत असून त्यांनी कॉम्प्युटर सायन्स मधील भविष्यातील संवर्धित वास्तविकता,आभासी वास्तविकता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांवर सहका-यांबरोबर वेगवेगळे संशोधन प्रकल्प पार पाडले असून याअंतर्गत त्यांनी आपल्या नावावर अमेरिकेत एक नवीन पेटंट नोंदवले असून त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की,"डॉ.हेमंत भास्कर सुरळे यांचे प्राथमिक शिक्षण एस.जी. विद्यालय झाले असून त्यांनी पुढील माध्यमिक शिक्षण येवल्यातील स्वामी मुक्तानंद विद्यालयात केले होते.सन-२०१० साली त्यांनी संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून आय.टी. इंजिनीरिंग पदवी मिळवून नंतर बिर्ला इन्स्टिट्यट ऑफ टेक्नॉलॉजी पिलानी,गोवा येथे कॉम्प्युटर सायन्स मध्ये प्रथम क्रमांक मिळवला होता.तद नंतर बंगलोर येथे एक वर्ष नोकरी केली.मात्र शिक्षणाची ओढ असल्याने कॅनडा येथील वॉटरलू विद्यापीठातून त्यांनी विशेष प्राविण्यासह कॉम्प्युटर सायन्स मध्ये डॉक्टरेट मिळवली होती.

दरम्यान पी.एच.डी.करीत असताना त्यांचे तीन शोध निबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द झाले होते.परिणामी त्यांना अमेरिकेतील प्रसिद्ध कंपनी स्नॅप फाउंडेशन यांची फेलोशिप सन-२०१९ मध्ये प्राप्त झाली होती.तेथे त्यांनी कॉम्प्युटर सायन्स मधील भविष्यातील Augmented Reality ( संवर्धित वास्तविकता ( Augmented Reality) व आभासी वास्तविकता (Virtual Reality) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता(Artifitial Inteligence) या विषयांवर सहका-यांबरोबर वेगवेगळे संशोधन केले होते.

त्याअंतर्गत त्यांनी एक नवीन स्वामित्व प्रणाली (पेटंट) विकसित केली आहे.ज्यामुळे स्मार्टचष्मे (Smartglass) वापरून विविध वापरकर्त्यांमध्ये आभासी संवादाचे (Virtual communication) सत्र आयोजित केले जाऊ शकणार आहे.

या प्रणालीमध्ये एका वापरकर्त्याच्या चष्म्यातील कॅमेरा आणि डिस्प्ले वापरून इतर वापरकर्त्यांशी वास्तविक वेळेत संवाद साधता येतो. वापरकर्ते आभासी माध्यम वस्तूंचा वापर करून संवाद साधू शकतात,ज्यामुळे वास्तविक जगातील वातावरणात आभासी वस्तू समाविष्ट करता येतात. या तंत्रज्ञानाने आभासी संवाद अधिक वास्तविक वाटण्यास मदत होणार आहे.ज्यामुळे वापरकर्त्यांचा अनुभव अधिक समृद्ध होणार आहे.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
समुह संपादक : सागर दोलतडे, कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१